अक्कलकोट शिवकिर्ती न्युज

मंगळवार दि. 24 नोव्हेंबर 2026 ता. अक्कलकोट जि. सोलापूर

सलगर गणाला निधी वाटपात दुय्यम वागणूक ?

अक्कलकोट | न्युज

सलगर गणावर निधी वाटपात अन्याय!
अक्कलकोट पंचायत समितीत समान निधी वाटप नाही ग्रामस्थांमध्ये संताप

अक्कलकोट, ता. : अक्कलकोट पंचायत समितीच्या निधी वाटपात सलगर गणाला कायमच दुय्यम वागणूक मिळत असल्याचा आरोप सलगर पंचायत समिती सदस्य भिमाण्णा सोलापूरे यांनी केला आहे. लोकसंख्या आणि गरज मोठी असतानाही सलगर गणातील गावांना निधी मिळत नसल्याने विकासकामे खोळंबली आहेत.

सलगर गणामध्ये 16 गावांचा समावेश होतो. गेल्या चार आर्थिक वर्षांत पंचायत समितीकडून या गणाला 0 रुपये निधी मिळाला. तर शेजारच्या सत्ताधारी सदस्यांच गणाला लाखो रुपये निधी देण्यात आला. ही तफावत पाहता निधी वाटपात समानता पाळली जात नसल्याचे स्पष्ट होते, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

कामे अडकली, जनता त्रस्त
निधी अभावी सलगर गणातील अनेक महत्त्वाची कामे अडकून पडली आहेत.
1. गाव रस्त्याची दुरवस्था – खड्ड्यांमुळे अपघात वाढले
2. पाणी पुरवठा योजनेची दुरुस्ती रखडली
3. गटार आणि अंतर्गत रस्त्यांची कामे कागदावरच

"आम्ही वारंवार मासिक सभेत ठराव घेऊन, पंचायत समितीकडे मागणी करूनही आमच्या गणाकडे लक्ष दिले जात नाही. आम्ही कर भरतो, मग विकासात भेदभाव का?" असा सवाल सलगर पंचायत समिती सदस्य यांनी उपस्थित केला.

सरपंच आणि सदस्यांची नाराजी
या विषयावर सलगर गणातील सरपंचांनीही नाराजी व्यक्त केली आहे. "पंचायत समितीच्या बैठकीत आम्ही विषय मांडतो, पण निधी वाटपाच्या वेळी आमचा गण डावलला जातो. हा सलगरच्या जनतेचा अपमान आहे," अशी प्रतिक्रिया एका सरपंचांनी दिली.

याबाबत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता, "निधी हा शासनाच्या नियमानुसार आणि उपलब्धतेनुसार दिला जातो. कोणावरही अन्याय केला जात नाही," असे त्यांनी सांगितले.

मात्र, प्रत्यक्षात आकडेवारी वेगळेच चित्र दाखवत असल्याने सलगर गणातील ग्रामस्थांनी आता आंदोलनाचा इशारा दिला आहे. जर येत्या काळात समान निधी मिळाला नाही, तर पंचायत समितीवर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सलगर पंचायत समिती सदस्य भिमाण्णा सोलापूरे यांनी दिला आहे.

तर पंचायत समितीवर मोर्चा काढण्यात येईल,



असा इशारा सलगर पंचायत समिती सदस्य भिमाण्णा सोलापूरे यांनी दिला आहे.